**वादीतर्फे साक्षीदार क्र.१ (स्वतः वादी) यांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु. प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. डी जी भणगे -**

**३५.** आता मला नि.क्र.७६ वरील रजेचा अर्ज दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर प्रलंबित ठेवण्यात आल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा अर्ज नामंजूर झाला होता. त्याबाबत मला दिनांक ०२.०५.२०१६ रोजी कळाले होते. दिनांक ०२.०२.२०१६ च्या इमेलद्वारे माझी सेवा प्रतिवादी कंपनीने दिनांक ३१.०३.२०१६ रोजी संपुष्टात आणल्याचे मला माहिती नाही. आता मला दस्त यादी नि.क्र.६८/1 वरील सदरील मेलची झेरॉक्सप्रत दाखविण्यात आली. साक्षीदार सांगतो की, सदरील दस्त कधीही मी पाहिलेला नाही आणि मी प्रतिवादी कंपनीत कार्यरत असताना मला तो कोणीही दाखविला सुध्दा नव्हता. sssrivastav@garwareropes.com हा माझा प्रतिवादी कंपनीतील इमेल आयडी असल्याचे मला सांगता येणार नाही. नि.क्र.७६ वरील अर्जावर तोच इमेल आयडी नमुद असल्याचे मला सांगता येणार नाही. (यावेळी साक्षीदारास नि.क्र.७६ दाखविण्यात आली)

**३६.** आता मला दिनांक १४.०८.२०१७ रोजीच्या कायदेशीर नोटीसीची नि.क्र.७८ वर असलेली प्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०२.०५.२०१६ ते १३.०८.२०१७ या कालावधीत मी कंपनीला कोणतीही कायदेशीर नोटीस पाठविली नव्हती. साक्षीदार सांगतो की, त्या दरम्यान मी वारंवार कंपनीत जावून विचारणा करीत होतो तसेच, कामगार न्यायालयात सुध्दा त्याबाबत दाद मागितली होती. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०६.०९.२०१७ रोजी मी दिलेल्या कायदेशीर नोटीसीला प्रतिवादी कंपनीने उत्तर दिले होते. त्यातील मजकूर चुकीचा व खोटा आहे. त्यानंतर, मी लागलीच दिवाणी दावा दाखल केलेला नाही. नि.क्र.७९ वरील दिनांक ३०.०१.२०१८ रोजी प्रतिवादी कंपनीस पुन्हा कायदेशिर नोटीस पाठविल्याचे खरे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०३.२०१६ रोजी माझी सेवा संपुष्टात आणली होती.

हे म्हणणे खरे नाही की, मी बँकेकडून घेतलेल्या कर्जाची वसुली सुरू झाल्यानंतरच मी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०९.२०१७ रोजी मला पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित यांनी मला त्याबाबत नोटीस दिली होती. साक्षीदार सांगतो की, सदरची नोटीस मला जामिनदार श्री. विलास सुब्बाराव पाटील यांनी दिली होती. आता मला दस्त यादी नि.क्र.७२/१३ वरील दस्त दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, ती तीच नोटीस आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरची नोटीस आल्यानंतर प्रतिवादी कंपनीकडून पैसे उकळण्याकरीता मी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५.०९.२०१७ ची नोटीस आल्यानंतर नि.क्र.७९ वरील दिनांक ३०.०१.२०१८ रोजीची नोटीस मी प्रतिवादी कंपनीस दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०३.२०१६ रोजी सेवा संपुष्टात आल्यानंतर त्यानंतर प्रतिवादी कंपनीकडून देय असलेले लाभ रक्कम रूपये १८,२५८/- माझ्या एच.डी.एफ.सी. बँकेच्या खात्यात दिनांक ०४.०७.२०१६ रोजी जमा करण्यात आलेले आहेत.

**३७.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी कंपनीने दिनांक ३१.०३.२०१६ पुर्वी सहा ते सात महिन्यांअगोदरच मला दुसरी नोकरी शोधण्याबाबत सांगितले होते. साक्षीदार सांगतो की, तसे मला ते नोकरी लागल्यापासूनच बोलत होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी कंपनीने माझी सेवा माझी सेवा करारनाम्यातील अटी व शर्तींप्रमाणे संपुष्टात आणलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, नोकरीत ठेवावे अथवा काढून टाकावे हा सर्वस्वी प्रतिवादी कंपनीचा अधिकार होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या अगोदर दिनांक ०२.०२.२०१६ रोजी सेवा समाप्तीची नोटीस प्रतिवादी कंपनीने दोन महिन्यांपुर्वी इमेलद्वारे दिलेली होती.

**उलटतपास पुर्ण,**
**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

दि. ०२/०४/२०२६. (आर.एम. भेंडे)

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.